आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१७ जुलै २०२५ - गुरूवार

**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ९व्या स्वच्छ सर्वेक्षण पुरस्कारांचं वितरण, राज्यातल्या नवी मुंबई, मीरा-भाईंदर आणि कराडला पुरस्कार

- महाराष्ट्रात विधान भवन परिसरात हाणामारी /राज्यात कायदा सुव्यवस्था बिघडली असून गुन्हेगारांना कायद्याचा धाक राहिलेला नसल्याची विधान परिषदेत विरोधी पक्षनेत्यांची टीका

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत्या चार महिन्यांत होतील असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत स्पष्टिकरण

- पुढची शंभर वर्षे निःसंशय सहकाराची असल्याचं केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांचं प्रतिपादन

**आणि**

- दिव्यांगांसाठीच्या राष्ट्रीय टेनिस स्पर्धेत लक्ष्मी जडालानं पटकावलं सुवर्णपदक

**<><><><>**

प्राचीन काळापासून स्वच्छता हा देशाच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक चेतनेचा भाग असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत ९व्या स्वच्छ सर्वेक्षण पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं, त्यावेळी त्या बोलत होत्या. स्वच्छ भारत अभियानांतर्गत राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रयत्नांचं कौतुक करताना राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या की स्वच्छ सर्वेक्षण हा एक यशस्वी उपक्रम ठरला आहे.

स्वच्छ भारत मिशन - शहरी अंतर्गत स्वच्छतेसाठी राबवण्यात येणाऱ्या उपक्रमाअंतर्गत यावर्षी सुपर स्वच्छ लीग शहरं आणि लोकसंख्येच्या आधारे पाच श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये, इंदूरने सलग आठव्या वर्षी भारतातील सर्वात स्वच्छ शहर म्हणून आपला किताब कायम ठेवला. केंद्र सरकारच्या वार्षिक स्वच्छता सर्वेक्षणात सुरत दुसऱ्या क्रमांकावर आहे, तर नवी मुंबई तिसऱ्या क्रमांकावर आहे. तसंच लोकसंख्येच्या आधारे विभागण्यात आलेल्या ५ श्रेणींमध्ये राज्यातल्या मीरा- भाईंदर, कराड या शहरांना सुपर

स्वच्छ शहर पुरस्कार मिळाला आहे. या कार्यक्रमादरम्यान, विविध श्रेणींमध्ये एकूण ७८ पुरस्कार प्रदान करण्यात आले.

**<><><><>**

महाराष्ट्रात आज विधानभवनाच्या प्रांगणात हाणामारी झाल्याचा मुद्दा दोन्ही सभागृहांमधे पुढं आला. आपल्याला मारण्यासाठी काही लोकांना बाहेरून आणलं होतं असा आरोप जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभेत केला. या सर्व प्रकरणाची चौकशी केली जाईल आणि दोषींवर कारवाई केली जाईल अशी ग्वाही अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिली. तर, आमदार गोपीचंद पडळकर यांना विधानभवनाच्या लॉबी मध्ये धक्काबुक्की झाल्याबाबत कारवाई करण्याची मागणी संजय उपाध्याय यांनी सभागृहात केली, ती तातडीनं केली जाईल अशी ग्वाही अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार नितीन देशमुख यांना विधानभवन परिसरात मारहाण झाल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी विधानसभेत दिली. याची माहिती घेऊन त्वरित कारवाई करावी असे निर्देश विधानसभा अध्यक्षांनी सरकारला दिले.

याबाबत बातमीदारांसी बोलताना माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले…

**- होल्ड - बाईट - -**

**<><><><>**

राज्यात कायदा सुव्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झालेली असून गुन्हेगारांना कायद्याचा धाक राहिलेला नाही, अशी टीका विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी अंतिम आठवडा प्रस्ताव मांडताना केली. या वर्षी ३१ मेपर्यंत राज्यात १ लाख ६० हजाराहून जास्त गुन्ह्यांची नोंद झाली असून त्यात बलात्काराचे ३ हजार ५०६, घरगुती हिंसाचाराचे सुमारे ४ हजार, तर खुनाचे ९२४ गुन्हे घडल्याचं सांगून, यावर उत्तर कोण देणार, असा सवाल दानवे यांनी उपस्थित केला.

वाढती सायबर गुन्हेगारी, अपुरं पोलीस दल, रखडलेली भर्ती, यातलं महिलांचं कमी असलेलं प्रमाण, अंमली पदार्थ, हुक्का, गुटखा इत्यादींचा वाढत असलेला विळखा, इत्यादी मुद्द्यांकडे त्यांनी लक्ष वेधलं. राज्यातल्या सगळ्या महानगरपालिकांमध्ये अनागोंदी कारभार, गैरव्यवहार होत असल्याचा आरोपही दानवे यांनी केला.

**<><><><>**

ओबीसी आरक्षणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली होती. त्यामुळे या निवडणुका आतापर्यंत झाल्या नाहीत. येत्या चार महिन्यांत या निवडणुका होतील असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत सांगितलं.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उत्तरावर राइट टू रिप्लाय करण्याची मागणी विरोधी पक्षांनी केली. या मुद्द्यावरून झालेल्या गदारोळामुळे अध्यक्षांनी सभागृहाचं कामकाज दहा मिनिटांसाठी तहकूब केलं.

पंढरपूर इथला सुधारित तीर्थक्षेत्र आराखडा लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात येतील असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सांगितलं. या आराखड्याअंतर्गत पंढरपुरातल्या सफाई कामगारांना ६०० चौरस फुटांची घरं देण्यात येणार असून, यासाठी सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले जातील असंही पवार यांनी सांगितलं.

**<><><><>**

इंग्लंडमधल्या संशोधकांनी तीन व्यक्तींची डिएनए वापरून आठ बाळांना जन्म दिला आहे. ही बाळं जनुकीय आजारांपासून मुक्त असतील. या प्रक्रियेच्या माध्यमातून चाल मुली आणि चार मुलांचा जन्म झाला असून यात एक जुळंही आहे. न्युकॅसल विद्यापीठाच्या संशोधकांनी केलेल्या प्रयोगात गंभीर आजाराचा धोका असलेल्या ७ महिलांना मातृत्व प्रदान करण्यात आलं असून ही सारी मुलं स्वस्थ असल्याचं म्हटलं आहे. इंग्लंड च्या एका वैद्यकीय जर्नलमध्ये ही प्रक्रिया सविस्तर सांगण्यात आली आहे.

**<><><><>**

सहकार क्षेत्राने गेल्या शंभर वर्षांमध्ये देशाच्या विकासात मोठी भूमिका बजावली असून पुढची शंभर वर्षे ही निःसंशय सहकाराची आहेत असं प्रतिपादन केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी केलं. ते आज राजस्थानात जयपूर इथं सहकारिता एवम रोजगार उत्सवात बोलत होते. शहा यांनी यावेळी शंभर नव्या पोलिस वाहनांना हिरवा झेंडा दाखवला तर विविध योजनांच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे अथवा धनादेशांचं वितरण केलं. जगातील सर्वात मोठी धान्यसाठवणूक योजना याअंतर्गत बांधलेल्या २४ गोदामांचं आणि चौसष्ठ तृणधान्य केंद्रांचंही उद्घाटन केलं. शाह यांनी यावेळी गोपाल क्रेडीट कार्ड योजनेंतर्गत एक हजार ४०० लाभार्थ्यांना १२ कोटींपर्यंतचं कर्जवाटप आणि श्वेतक्रांती २.०० च उद्घाटन केलं.

<><><><>

मध्यप्रदेशातल्या ग्वाल्हेर इथे आयोजित दिव्यांगांसाठीच्या राष्ट्रीय टेनिस स्पर्धा 2025 मध्ये लक्ष्मी जडालाने सुवर्णपदक पटकावलं आहे. पंधरा वर्षीय लक्ष्मी जडाला मानसिक विकलांग आहे. या विजयामुळे इजिप्तमध्ये कैरो इथं होणाऱ्या विशेष ऑलिंपिक जागतिक स्पर्धा 2027 साठी लक्ष्मी जडाला अधिकृतपणे पात्र ठरली आहे.

<><><><>

कृषी विद्यापीठे आणि संशोधन संस्थांना प्रधानमंत्री कृषी धन-धन योजनेअंतर्गत कृषी उत्पादकता वाढवण्यासाठी योगदान देण्याचं आवाहन केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलं आहे. बिहारमधल्या  समस्तीपूर इथल्या  पुसा इथं  डॉ. राजेंद्र प्रसाद केंद्रीय कृषी विद्यापीठाच्या चौथ्या दीक्षांत समारंभाला संबोधित करताना आज ते बोलत होते.   भारत तांदूळ उत्पादनात स्वयंपूर्ण झाला असून, ५० हजार कोटी रुपयांचा बासमती तांदूळ निर्यात करत आहे, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

<><><><>

भारतीय लष्कराच्या आकाश शस्त्र प्रणालीनं आज लडाखच्या समुद्र सपाटीपासून खूप उंचीवर असलेल्या एका मानवरहित वेगवान लक्ष्याचा भेद केला. भारतीय लष्कराच्या क्षमतेचा हा मैलाचा दगड ठरला आहे. प्राईम आकाश शस्त्र प्रणाली या आधीच्या आकाश प्रणालीचं सुधारीत रुप आहे. या प्रणालीच्या सहाय्यानं समुद्र सपाटीपासून ४ हजार ५०० मीटर उंचीवरचं लक्ष्य भेदण्यात आलं.

डीआरडीओच्या पुढाकारानं शस्त्रनिर्मितीतल्या सार्वजनिक कंपन्यांच्या सहाय्यानं ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

<><><><>

बिहारमध्ये गेल्या २४ तासांत वीज कोसळून १९ जण ठार झाले आहेत. नालंदा जिल्ह्यात सर्वाधिक पाच , तर वैशाली जिल्ह्यात आज चार जणांचा मृत्यू झाला आहे. पाटणा आणि बांका जिल्ह्यात प्रत्येकी दोन जणांचा मृत्यू झाला आहे. शेखपुरा, औरंगाबाद, समस्तीपूर, नवादा, जमुई आणि जहानाबाद जिल्ह्यातही जीवितहानी झाल्याची नोंद झाली

आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी ४ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**<><><><>**

पाकिस्तानात गेल्या काही दिवसांपासून सुुरु असलेल्या पावसामुळे घडलेल्या विविध दुर्घटनांमध्ये आतापर्यंत १२४ जणांचा बळी गेला आहे. यामध्ये २६४ नागरिक जखमी झाले आहेत. पंजाब प्रांतात पावसामुळे घडलेल्या विविध घटनांमध्ये ४४ जणांना प्राण गमवावे लागले आहेत. १६ जणांचा बलुचिस्तान भागात बळी गेला असून लाहोरमध्ये ही संख्या सर्वाधिक आहे. झेलम आणि चिनाब नद्यांना पूर आल्यामुळे पंजाब भागातली अनेक शहरांमध्ये पाणी भरलं आहे.

**//<><><><>//**